अस्सल सोलापुरी


# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शनिवार, दि. १४ मार्च २०२६ । ▶ वर्ष : २४ वे ▶ अंक : १६४ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## इराणला कदाचित पुतिन मदत करत असतील : ट्रम्प



✔ **वॉशिंग्टन :** अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्ध आणखी भडकण्याची चिन्ह आहेत. गेल्या जवळपास १४ दिवसांपासून हे युद्ध सुरू आहे. अमेरिका-इस्रायल संयुक्तपणे इराणवर हल्ले करत आहेत, तर इराणही जोरदार प्रतिहल्ले करत असल्यामुळे मध्य पूर्वेत युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या युद्धामुळे जगातील अनेक देशांना होणारा तेल आणि वायूचा पुरवठा विस्कळीत झाला आहे.

एवढंच नाही तर होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती असल्याने तेलाच्या जहाजांच्या वाहतुकीला अडथळे येत आहेत. व्यापारी जहाजांवर हल्ले होत असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव वाढत आहे. अशा परिस्थितीतही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे इराणला धमकी देणारे विधाने करत आहेत. पुढील आठवड्यात इराणवर आणखी जोरदार हल्ला करण्याची योजना असल्याचं डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतंच म्हटलं आहे. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी आणखी एक मोठं वक्तव्य केलं आहे. इराणला कदाचित रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन मदत करत असतील', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

# सल्फ्युरिक ॲसिड अन् गंधकाच्या तुटवड्यामुळे हंगाम धोक्यात!

**गॅस पाठोपाठ सल्फ्युरिक ॲसिडच्या तुटवड्याची शक्यता**

**साखरेबरोबरच खतांच्या निर्मितीमध्ये नवी अडचण**

**१५ हजार रुपये टन असणारे ॲसिड आता ६० हजार रुपयांवर**

## युद्धाच्या वणव्याची सोलापूर जिल्ह्यातील साखर उद्योगावर काजळी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

एलपीजी प्रमाणे पुढील काळात सल्फ्युरिक ॲसिडचाही तुटवडा जाणवेल. यामुळे देशात सर्वाधिक ४५ हून अधिक साखर कारखाने असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील साखर उद्योगाला युद्धाच्या झळा बसणार आहेत. युद्धाच्या झळांची काजळी या जिल्ह्याच्या साखर पट्ट्यावर येणार आहे. साखर कारखान्यांच्या उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. त्यातून सोलापूर जिल्ह्याचे अर्थकारण अडचणीत येणार आहे. पेट्रोलियम पदार्थातील गंधक बाजूला करुन त्याचा साखर बनिविण्यासाठी उपयोग केला जातो. येत्या १५-२० दिवसात याचा साठा कमी होईल असे सांगण्यात आले. केवळ साखर कारखाने नाही तर कपडा आणि साबण बनविण्याऱ्या कंपन्यांना रसायने मिळण्यात मोठी अडचण होऊ शकते, असे सांगण्यात येत आहे.



### ■ खतांमुळे बळीराजा पुन्हा येणार अडचणीत

खतांच्या निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल युद्धामुळे मिळणं अशक्य आहे. कच्च्या मालाच्या पुरवठ्याची साखळी तुटली आहे. त्यामुळे कच्चा माल मोठ्या चढ्या भावाने घ्यावा लागणार आहे. त्याशिवाय उत्पादन कमी होणार आहे. त्यामुळे एकतर शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात खतं मिळणार नाहीत, त्यातून खरेदी करायची म्हटलं तर चढ्या भावाने खरेदी करावी लागणार आहेत. त्यामुळे बळीराजासमोर खतांचं दुसरंच मोठं संकट उभा ठाकणार आहे.

साखर कारखान्यांमध्ये उसाच्या रसापासून साखर वेगळी करण्यासाठी रसातील पाण्याचे प्रमाण कमी करताना सल्फ्युरिक ॲसिडचा वापर करावा लागतो. गेल्या वर्षी १५ हजार रुपये टन असणारे ॲसिड आता ६० हजार रुपयांपर्यंत वाढले आहे. साखर कारखान्याच्या प्रक्रियेत गंधक लागते. हे तेल शुद्धीकरणाच्या प्रक्रियेतून मिळते. या क्षेत्रात महाराष्ट्रात एकमेव पुरवठादार एजन्सी म्हणून रिलायन्स हे एकमेव नाव होते. तेल शुद्धीकरण करणाऱ्या कंपन्यांकडून सिडचा पुरवठा होतो. साधारणत: मध्यम क्षमता असणाऱ्या साखर कारखान्यांना २५० टन एवढे ॲसिड लागते. युद्धजन्य स्थितीमध्ये हा पुरवठा विस्कळीत होऊ शकतो अशी भीती व्यक्त होत आहे.

### तज्ज्ञ म्हणाले, परिस्थिती अवघड...

या क्षेत्राची माहिती असणारे तज्ज्ञ म्हणाले, 'कच्च्या तेलाची गुणवत्ता हलके किंवा जड आणि गोड किंवा तुरट अशा प्रकारे मोजले जाते. मध्य पूर्व भागातून येणाऱ्या तेलामध्ये गंधकाचे प्रमाण १.५ ते २.५ टक्के असते. व्हेन्यूझुएलामधून येणाऱ्या कच्च्या तेलात गंधकाचे प्रमाण अनुक्रमे ३ ते ५.५ एवढे असते. तर रशियाकडून येणाऱ्या तेलात हे प्रमाण तुलनेने कमी असते. गंधक हा साखरेसाठी मुख्य घटक असतो. त्याचे दर आणि उपलब्धता यात समस्या येऊ शकतात. त्याकडे सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.' गेल्या काही आठवड्यात ॲसिडच्या किंमतीमध्ये ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. गंधक केवळ निर्यातीवर अवलंबून नाही. मात्र, युद्धस्थितीमध्ये याकडे लक्ष दिले नाही तर परिणाम गंभीर होऊ शकतात. केवळ साखरच नाही तर खते, धातूवरील प्रक्रिया उद्योग, तेल शुद्धीकरण कारखाने, रंग आदीमध्ये वापरली जाते. त्यामुळे आता सल्फ्युरिक सिडचा तुटवडा होऊ शकतो. यातून मार्ग काढण्यासाठी विविध कंपन्यांबरोबर सरकारने समन्वय ठेवून काम करावे, असा सल्लाही उद्योग मंत्र्यांना बैठकीत देण्यात आला.

**बेलाटीजवळ विजापूर बायपास रोडवर भीषण अपघात**

## कार कंटेनरवर आदळून दोन तरुण जागीच ठार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

बेलाटीजवळ विजापूर बायपास रोडजवळ झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. कारची कंटेनरला जोरदार धडक झाल्याने हा अपघात घडल्याची माहिती मिळाली आहे. या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणांची नावे इमादुद्दीन बागवान (वय १८ वर्षे) आणि अमन निसार बागवान (वय १९ वर्षे) अशी आहेत, हा अपघात शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, इफ्तारनंतर दोन्ही तरुण चहा पिण्यासाठी आणि फेरफटका मारण्यासाठी बाहेर गेले होते. त्याचवेळी विजापूर बायपास रोडजवळ त्यांच्या कारची कंटेनरला जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सोलापूर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नातेवाईकांची मोठी गर्दी झाली होती. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



## राखीव पोलीस दलाच्या गैरहजर जवानाची सोलापुरात आत्महत्या

✔ सोलापूर/प्रतिनिधी

दौंड येथील एसआरपीएफच्या एका जवानाने सोलापूर नजिकच्या बिरसा मुंडा नगर मुळेगाव तांडा (ता. दक्षिण सोलापूर) येथे सासुरवाडीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटनेने खळबळ माजली आहे. गुरुवार (ता.१२) सांयकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. विलास सर्जेराव शिंदे (वय ३५) असे आत्महत्या केलेल्या एसआरपीएफ जवानाचे नाव आहे.



विलास शिंदे

मृत विलास शिंदे हे मूळचे कळंब (जिल्हा धाराशिव) येथील रहिवासी होते. जुने भांडण आणि ३०७ केस मागे घेण्याच्या कारणावरुन अणदूर (ता. कळंब, जि. धाराशिव) येथील सहा संशयित आरोपींनी मृत शिंदे यांना शिवीगाळ करुन जीव ठार मारण्याची धमकी देण्यासह गावातील चार-चौघांसमोर तोंडावर चपलांनी मारहाण केली. त्याचा अपमान सहन न झाल्याने जवान शिंदे यांनी गळफास घेऊन स्वत:ला कायमचे संपवले आहे.अशी फिर्याद आहे. याप्रकरणी मृत विलास शिंदे यांची पत्नी बडतर्फ पोलीस पुनम शिंदे यांनी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

(अधिक वृत्त पान ७ वर...)

### आत्महत्येची आणखी काही कारणे येऊ शकतात समोर

संशयितांनी गावासमोर मारहाण केल्याचा अपमान सहन न झाल्याने मृत विलास शिंदे यांनी आत्महत्या केली, अशी फिर्याद मृताची पत्नी पुनम यांनी दाखल केली असली तरी अन्य काही कारणे तपासामधून पुढं येतील असं तपासअधिकारी सहायक पोलीस निरीक्षक कदम यांनी सांगितले. मृत जवान हा मागील दोन वर्षांपासून कामावर जात नाही. गैरहजर होता. तर त्यांची पत्नी पुनम यांच्यावरदेखील बडतर्फीची कारवाई करण्यात आलेली आहे. कुंटुंबामध्ये हे दोघे डिस्टर्ब होते. तणावाखाली होते. या सगळ्या पार्श्वभूमीवर, आत्महत्येची काही वेगळी कारणे समोर येण्याची शक्यता असल्याचेही कदम म्हणाले.

### पुनम शिंदेंवर बडतर्फीची कारवाई

मृत एसआरपीएफ जवान विलास शिंदे यांच्या पत्नी पुनम शिंदे या सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाकडे पोलीस कर्मचारी म्हणून कार्यरत होत्या. मात्र त्यांच्यावर शिस्तभंगाच्या कलमाखाली बडतर्फीची कारवाई करण्यात आलेली आहे, असे तालुका पोलिस ठाण्यामधील पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले. विलास शिंदे हे दौंड येथील एसआरपीएफ बल गट क्रमांक ७ मध्ये कार्यरत होते. मात्र गेली दोन वर्षे ते कामावर गैरहजर होते . विलास शिंदे यांच्या पश्चात आई, पत्नी पुनम काळे, ३ वर्षांचा मुलगा आणि ५ वर्षांची मुलगी असा परिवार आहे.

### डॉक्टरांनी मृत घोषित केले

१२ मार्च २०२६ रोजी रात्री आठच्या सुमारास विलास शिंदे यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ते अनेक वर्षांपासून सोलापुरात पत्नी आणि मुलांसोबत राहत होते. गळफास घेतल्याची माहिती मिळताच नातेवाईकांनी त्यांना बेशुद्ध अवस्थेत सोलापूर शहरातील खासगी रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतदेहाचे शवविच्छेदन सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात करण्यात आले आहे.

## नेपाळमधील रॅकेट; सोलापुरात फसवणूक

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरमधील व्यापाऱ्याला १० ते ३०० टक्क्यांपर्यंत फायदा मिळवून देतो, असे सांगून ७२ लाख ६४ हजारांना फसवल्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आरोपी रोज मगर थापा (वय २३, रा. बोसन, काठमांडू, नेपाळ) याला अटक केली. आरोपीला सोलापूर सायबर पोलिसांनी दिल्ली येथील इंदिरा गांधी विमानतळावरून ८ मार्चला अटक केली.

आरोपीने व्यापारी आहुजा यांच्याशी ऑनलाईन संपर्क साधून जास्त फायदा करून देण्याचे आमिष देऊन फिर्यादीस ७२ लाख रुपयांना फसवले होते.

या गुन्ह्यात सोलापूर शहर सायबर पोलिसांनी आतापर्यंत एकूण ४ आरोपी निष्पन्न केले होते. याच प्रकरणाचा सूत्रधार आरोपी रोज थापा व त्याचे सहकारी आरोपी दोरजे तमांग यांनी आहुजा यांच्या फसवणूक रकमेपैकी काही रक्कम खासगी बँकेत वर्ग केले होते. यातील जवळपास १७ लाख रुपये पोलिसांनी हस्तगत केले.

### कमिशन देऊन बँक खाते घ्यायचा भाड्याने

सूत्रधार आरोपी रोज मगर थापा हा नेपाळचा नागरिक आहे. नेपाळ येथे संपर्कात आलेल्या चीनी नागरिकांच्या सांगण्यावरून तो भारतात आपल्या अन्य साथीदारांसोबत येऊन भारतीय नागरिकांना कमिशनचे आमिष दाखवून त्यांचे बँक खाते गुन्ह्यात वापरण्यास घेतो. त्या खात्यातून फसवणुकीची रक्कम स्वीकारून, रक्कम पुढे वर्ग करत होता. आरोपीने दिल्ली, महाराष्ट्र, पश्चिमबंगाल, मध्य प्रदेश व मणिपूर येथे राहून फसवणुकीचे काम करत होते. दरम्यान, पोलिसांनी आरोपीची माहिती मिळवून त्याचे विरुद्ध सन २०२५ मध्ये लूक आऊट नोटीस काढण्यात आली होती.

### पोलिसांनी दिल्लीत ठोकल्या बेड्या

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मी डॉक्टर असूनही या 'गॅस ट्रबल'वर काही करू शकत नाही !

कल्याण 335-15-230

मुंबई 458-72-156

1 6 2

## उकाड्याने सोलापूरकरांनी सहन केली कासावीस

### पुढील तीन दिवसात अवकाळीचा अंदाज : तळपता सूर्य त्यात ४०.१ तापमान

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहराचा पारा शुक्रवारी ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे.त्यामुळे घामाच्या धारांनी सोलापूरकरांची दिवसभर घालमेल झाली तसेच बाहेर पडलेल्या लोकांना तगमग सहन करावी लागली. यंदाच्या उन्हाळ्यातील तापमानाचा हा उच्चांक आहे. मार्च महिन्याच्या दुसऱ्याच आठवड्यात पारा इतका चढला आहे. त्यामुळे अजून अडीच महिन्यात उन्हाळा काय असेल,याची चिंता आतापासूनच लागून आहे. गुरूवारी पारा ३९.१इतका होता.




गेल्या काही दिवसांतच राज्यातील हवामान प्रचंड बदल झाले असून, तापमान वाढल्यामुळे उकाडा वाढला आहे. मात्र, पुढील काही दिवस महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळी परिस्थिती असेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. उन्हाचा पारा वाढत असल्यामुळे उकाडा वाढला आहे. त्यातच पुढील तीन-चार दिवसांत हवामानात कमालीचा बदल होण्याचा अंदाज आहे. काही जिल्ह्यात उष्णतेची लाट येणार असून, काही भागात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने काही जिल्ह्यामध्ये उष्णतेची लाट येण्याचा इशारा दिला आहे, तर काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. शनिवारी (१४ मार्च) कोकण आणि उर्वरित महाराष्ट्रात हवामानातील बदल कायम राहण्याचा अंदाज आहे. मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगडमध्ये उष्णतेची लाट असणार आहे. तर पूर्व विदर्भातील काही जिल्हे, मराठवाड्यातील काही जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. रविवारी (१५ मार्च) म्हणजे सुट्टीच्या दिवशी अनेकांचा फिरण्याचा प्लॅन फसू शकतो. कारण विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस होणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. सोमवारी (१६ मार्च) नागपूर, अमरावती, वर्धा, भंडारा, गोंदिया या विदर्भातील जिल्ह्यांसह मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्याचबरोबर मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यातही वादळी पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. काही जिल्ह्यात गारपीट होण्याचा अंदाज असून, राज्य सरकारने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजावर लक्ष ठेवून शेतीच्या कामांचे नियोजन करावे आणि संभाव्य पाऊस व वादळी वाऱ्यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कृषी विभागाने म्हटले आहे.

